Estd 1962

Naac 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## २१/१०/२०२१

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च/एप्रिल २०२१ च्या परीक्षा दि.१० ऑगस्ट २०२१ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरु झाल्या. दि.२८ सप्टेंबर २०२१ पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षांना प्रारंभ झाला. आज दि.२१ ऑक्टोबर २०२१ रोजी एम.एस्सी. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या.

आजच्या परीक्षेसाठी ४४ विद्यार्थ्यांपैकी ४१ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिली. ऑनलाईन परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचण उद्‌भवू नये यासाठी तांत्रिक अडचणीचे निराकरण करणेसाठी परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनीची यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आली होती.

**आज दि.२१ ऑक्टोबर २०२१ रोजी खालील एकुण ६ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले व आजपर्यंत एकुण ५१७ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.**

| | | | |
|---|---|---|---|
| **1** | **M.Sc. (Statistics) Sem. 1 & 2** | **2** | **B.A.B.Ed. – Sem. 5 & 7** |
| **3** | **M.Sc. (Applied Statistics & Informatics) Sem. 1 & 2** | | |

तसेच शैक्षणिक वर्ष २०२१—२२ या वर्षासाठी एम.फिल/पीएच.डी. साठीची प्रवेश परीक्षेचे आयोजन दि.२६, २७ व २८ ऑक्टोबर २०२१ रोजी करण्यात आले आहे. सदरची परीक्षा ही कोल्हापूर येथील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर, सांगली येथील श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली आणि सातारा येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा या तीन महाविद्यालयामध्ये होणार आहेत. या परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आले असून संबंधित विद्यार्थ्यांनी वेळापत्रक तपासून पहावे असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी दिली.